जा.क्र.जिशचिर/एनएचएम/रुप्रकें/ १५९६६ /२०२६
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय
दि. /१०/२०२६ 22 OCT 2026

## रुग्णालय प्रशिक्षण केंद्र जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी

## दरपत्रक जाहिर सूचना

सुचित करण्यात येते की, जिल्हा शल्यचिकित्सक रत्नागिरी कार्यालयामधील सन २०२६-२७ मध्ये रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र येथे नियोजितपणे विविध प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जात असतात. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीमध्ये चहा, नाष्टा व जेवण पुरविण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे तरी खालील नमूद केल्याप्रमाणे माहे नोव्हेंबर २०२६ ते सप्टेंबर २०२७ पर्यंत ११ महिन्याकरीता आवश्यकतेप्रमाणे चहा, नाश्ता व जेवण पुरवठा करणे करीता या दरपत्रक जाहिर सूचनेद्वारे इच्छुक पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र | तपशिल | व्यक्तींची संख्या | प्रति १ नग दर |
|---|---|---|---|
| १ | ०२ वेळा चहा, १ वेळा नाष्टा व ०२ वेळा जेवण(स्वीट डिश सह) (१ सुकी भाजी, १ रस्सा भाजी, चपाती, भात, वरण, आमटी, पापड, लोणचे, कोशिंबीर) आणि प्रत्यक्ष रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे सेवा देणे आवश्यक | एक-दोन किंवा दोन पेक्षा जास्त (प्रशिक्षण नियोजनाप्रमाणे संख्या बदलत राहिल. | |

## दरपत्रके सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१) इच्छुकांनी वरील लागणारे आहाराचे दरपत्रक सिलवंद लिफाफा मध्ये लेटर हेडवर आपल्या सही शिक्का निशी स्वच्छ अक्षरात खाडाखोड शिवाय सादर करावे. तसेच बंद लखोटयावर **रुग्णालय प्रशिक्षण केंद्र रत्नागिरी (HTT) प्रशिक्षणार्थीसाठी अन्नपुरवठा दरपत्रक** असे नमुद करणे आवश्यक (खाडाखोड असलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.)

२) दर नमूद करताना करासहित दाखवावे किंवा तसा स्पष्ट उल्लेख दरपत्रकामध्ये नमुद करावा.

३) संस्थेचे व्यवसाय नोंदणीपत्रकाची प्रत सोबत जोडणे आवश्यक.

४) दुकानाचे शॉपॲक्ट प्रमाणे जीएसटी नोंदणी पत्रकाची प्रत सोबत जोडणे आवश्यक व्यवसायाच्या व्याप्ती नुसार जीएसटी क्रमांक आवश्यक, जर जीएसटी क्रमांक नसल्यास तसे स्वतंत्र स्वप्रमाणित केलेले मुलप्रमाणपत्र आवश्यक संस्था/दुकान विषयक नोंदणी दाखला.

५) अन्न व औषध प्रशासनाचा दाखला.

६) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत दयावी (बचत गट असल्यास बचत गटाच्या नावाने पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

७) दरपत्रके पोच करण्याचे ठिकाण : जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी कार्यालयात कामकाजाच्या वेळेत (सुट्टी वगळता दि.30/10/2026 ( ०५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा टपालाने पोच होणे आवश्यक. ईमेल द्वारे प्राप्त दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
दरपत्रक कालावधी दि. 22/१०/२०२६ ते दि. 30/10/२०२६

८) दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

९) प्रशिक्षण आयोजित केलेल्या ठिकाणी जेवण, चहा, नाष्टा पुरवठा करणेचा आहे.

१०) प्रशिक्षणासाठी सर्वसाधारणपणे सकाळी ९.३० ते १०.०० या वेळेत चहा व नाष्टा, त्यानंतर दुपारी १.०० ते २.०० या वेळेत जेवण, दुपारी ३.०० वाजता चहा व रात्री ८.३० ते ९.०० या वेळेत जेवण अशी अन्नपुरवठा करण्याची वेळ राहील. वरील वेळेमध्ये वदल होऊ शकतो. वेळेत झालेल्या वदलाची आगावू कल्पना दिली जाईल. त्यानुसार दिलेल्या वेळेत अन्नपुरवठा करणेचा आहे.

११) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण/नाष्टा नंतरची त्या ठिकाणीची सफाई पुरवठादाराने करावयाची आहे.

१२) प्रशिक्षण अथवा प्रशिक्षणार्थी यांचा उपवास असल्यास अल्पोपहार/जेवण वेळेत उपवासाचे पदार्थ उदा. साबू खिचडी-दही किंवा साबूदणा वडा, वेफर्स, केळी किंवा सफरचंद इ. दयावे लागेल.

१३) प्रशिक्षण संस्थेत अन्न तयार करण्यासाठी जागा व पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी उपलब्ध नाहीत.

१४) अन्न पदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत. गरम अन्नपदार्थ वाढणेसाठी प्लास्टीकचा वापर करु नये.

१५) प्रत्येक प्रशिक्षणाच्या पूर्वी १ किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार पदार्थ पुरवावयाचे आहेत.

१६) उपस्थिती पत्रकाच्या नोंदीवरुन जेवण/चहा/नाश्ताचे देयक पी.एफ.एम.एस. द्वारे अथवा एन.ई.एफ.टी द्वारे अदा केले जाईल.

१७) ठरवून दिलेल्या वेळेत खादय पदार्थ दिले पाहिजेत. निवासी प्रशिक्षणामध्ये रात्रीच्या जेवणाचा सामावेश असेल.

१८) पुरवठादाराने दरपत्रक देतेवेळी कोणतीही अट घालावयाची नाही.

१९) आयकर, व्यवसाय कर इ. तसेच नियमानुसार जे शासकिय कर लागु असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील. तसेच देयकातुन नियमानुसार टीडीएस कपात करण्यात येईल.

२०) मंजूर दरपत्रकामधील बाबींचा पाठपुरवठा करणे आपणास शक्य झाले नाही व त्यामुळे वाढीव दराने बाहेरुन खरेदी करावी लागली तर दरपत्रकातील मंजूर दर वाढीव दर या मधील फरकाची रक्कम आपल्याकडून करण्यात येईल.

२१) दरपत्रके स्विकारण्याची मुदत नोटीस प्रसिध्दी दिनांक पासून ३०/१०/२०२५(सायं ०५ वाजेपर्यत) नंतर उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२२) वरील अटीमध्ये बदल करणे किंवा शिथिल करणे अथवा नवीन अट सामाविष्ट करण्याचा अधिकार मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

२३) कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांनी राखुन ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

मा. जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी
शासकिय रुग्णालय रत्नागिरी
जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी.